॥ सा विद्या या विमुक्तये ॥
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत
SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED
'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA
Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade

Fax : (02462) 215572
Phone: (02462) 215325

**Public Relations Office (PRO)**
**जनसंपर्क कार्यालय**

website: srtmun.ac.in
E-mail: pro@srtmun.ac.in

संदर्भ क्र.: ज.का./२०२४-२५/१७४ दि.०१/१०/२०२४

## 'स्वारातीम' विद्यापीठातील एक अधिकारी व तीन कर्मचारी सेवानिवृत्त

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील शैक्षणिक विभागाचे उपकुलसचिव महेश हरिश्चंद्र त्रिभुवन, आस्थापना विभागातील सहा. अधिक्षक रामचंद्र पांडुरंग शेंबोले, ज्ञानस्त्रोत केंद्रातील वरिष्ठ ग्रंथालय सहाय्यक डॉ. राजेश देवराव काळे आणि विद्यापीठ निधीतील सफाईगार कर्मचारी प्रकाश अर्जुन रगडे हे चारही कर्मचारी दि. ३० सप्टेंबर रोजी नियतवयोमानुसार सेवानिवृत्त झाले आहेत. त्यांचा सेवानिवृत्तीचा कार्यक्रम दि. ०१ ऑक्टोबर रोजी विद्यापीठाच्या अधिसभा सभागृहामध्ये आयोजित करण्यात आला होता. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांनी चारही सेवानिवृत्त सत्कारमूर्तीचे शाल, श्रीफळ व स्मृती चिन्ह आणि मानपत्र देऊन सपत्नीक सत्कार केला.

यावेळी कुलसचिव डॉ. शशिकांत ढवळे, व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. सुर्यकांत जोगदंड, डॉ. डी.एन. मोरे यांची व्यासपीठावर विशेष उपस्थिती होती.

उपकुलसचिव महेश त्रिभुवन यांनी त्यांच्या कार्यकाळात विद्यापीठाला २५ वर्षे सेवा दिली. त्रिभुवन यांना विद्यापीठाने २०१५-१६ या वर्षात 'उत्कृष्ट अधिकारी' हा पुरस्कार देवून सन्मानित केले. त्यांनी त्यांच्या कार्यकाळात परीक्षा विभाग, शैक्षणिक विभागासह विविध विभागामध्ये सेवा दिली. शेवटी ते पदमान्यता या विभागातून सेवानिवृत्त झाले आहेत.

सहा. अधिक्षक पांडुरंग शेंबोले हेही नियतवयोमानानुसार सेवानिवृत्त झाले आहेत. शेंबोले यांनी कनिष्ठ लिपिक पदापासून ते सहा. अधिक्षक पदापर्यंतची अशी एकूण २५ वर्ष सेवा विद्यापीठास दिली. त्यांच्या कार्यकाळात त्यांनी लेखा विभाग, सभा व निवडणूक विभाग, आस्थापना विभाग इ. विभागामध्ये आपली सेवा दिली.

वरिष्ठ ग्रंथालय सहाय्यक डॉ. राजेश काळे हेही नियतवयोमानानुसार सेवानिवृत्त झाले आहेत. डॉ. काळे यांनी एकूण २६ वर्ष सेवा विद्यापीठातील ज्ञानस्त्रोत केंद्रास दिली आहे.

विद्यापीठ निधीतील सफाईगार कर्मचारी प्रकाश रगडे हेही नियतवयोमानानुसार सेवानिवृत्त झाले आहेत. रगडे यांनी एकूण २८ वर्ष सेवा विद्यापीठाला दिली आहे. त्यांनी त्यांच्या कार्यकाळामध्ये संपदा विभाग, पदव्युत्तर विभाग, अतिथिगृह, भूशास्त्र संकुल, ललित व प्रयोगजीवी कला संकुल इ. विभागामध्ये सेवा दिली.

विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांनी या चारही कर्मचाऱ्यास त्यांनी विद्यापीठास दिलेल्या उत्कृष्ट सेवेबद्दल कौतुक केले आणि त्यांना पुढील जीवन सुखीं, समृद्धी व आरोग्यमय लाभो अश्या शुभेच्छा दिल्या. विशेष म्हणजे या पुढे प्रत्येक सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना 'मानपत्र' दिले जाईल. असे जाहीर केले. कुलसचिव डॉ. शशिकांत ढवळे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करून या सर्व सेवानिवृत्त कर्मचाऱ्यास पुढील जीवन सुखीं, समृद्धी व आरोग्यासाठी शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी मा. व्यवस्थापन परिषद सदस्य, मा. अधिसभा सदस्य, संविधानिक अधिकारी, संचालक, शिक्षक, अधिकारी व कर्मचारी यांच्यासह उपस्थित नातेवाईक यांनीही या सर्वांना पुढील जीवन सुखीं, समृद्धी व आरोग्यासाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन ज्ञानस्त्रोत केंद्राचे संचालक डॉ. जगदीश कुलकर्णी यांनी केले.

---